**नवरा बायको**

**नोंदीत दिलेल्या पर्यायी शब्दांचा क्रम हा त्यांच्या एकूण सर्वेक्षणातील वारंवारितेनुसार दिलेला आहे याची नोंद घ्यावी.**

'नवरा-बायको' या संकल्पनेसाठी महाराष्ट्रात खूप वैविध्य आढळून आले आहे. नवरा-बायको, पती-पत्नी, मालक-मालकीन, कारभारी-कारभारीन, घो-बायल, घरवाला-घरवाली, धनी-अर्धांगीनी, होडास-होडीस, मरद-औरत, मिया-बिबी, मिस्टर-मिसेस, हजबंड-वाइफ इ. शब्द आढळले. याशिवाय नवरा या संकल्पनेसाठी दादला, दाद्या, लाडा, बायलस, साज़न, साहेब, यज़मान, वर, बवा, माटी इ. तर बायको या संकल्पनेसाठी लक्शीमी, बिऱ्हाड, कुटुंब, मंडळी, नवळी, घोळनी, लुगाई इ. शब्द आढळले. या संकल्पनेसाठी मिळालेले शब्द विस्ताराने पुढे पाहू.

**नवरा** हा शब्द संपूर्ण महाराष्ट्रात आढळून येतो. या शब्दाचे नवरो, नवरास, न्हवरा, इ. ध्वन्यात्मक वैविध्य आढळते. तसेच **पती** हा शब्दही संपूर्ण महाराष्ट्रात आढळून येतो. **मालक** हा शब्द पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात आढळून येतो. उर्वरित महाराष्ट्रात तुरळक प्रमाणात आढळून येतो. हा शब्द महिला जास्त प्रमाणात वापरताना दिसतात. **कारभारी** हा शब्द रत्नागिरी आणि परभणी जिल्ह्यामध्ये दिसून येतो. तसेच पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात हा शब्द तुरळक प्रमाणात आढळून येतो. या शब्दाचे कारभारी, कारबारी इ. ध्वन्यात्मक वैविध्य आढळले. **घो** हा शब्द सिंधुदुर्गात जास्त प्रमाणात आढळून येतो. त्याचबरोबर रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातील मुस्लिम समाजात आणि रायगड जिल्ह्यात हा शब्द तुरळक प्रमाणात दिसून येतो. याशिवाय हा शब्द सिंधुदुर्ग जिल्ह्याला लागून असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यात आणि रत्नागिरी जिल्ह्याला लागून असलेल्या राधानगरी तालुक्यात तुरळक प्रमाणात आढळून येतो. या शब्दाचे घोव, गव, घोस इ. ध्वन्यात्मक वैविध्य आढळते. **घरवाला** हा शब्द भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, पालघर आणि नाशिक या जिल्ह्यात जास्त प्रमाणात आढळून येतो. तर कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, अहमदनगर, धुळे, जालना, अमरावती, वर्धा, नागपूर या जिल्यात तुरळक प्रमाणात आढळून येतो. महिलांमध्ये हा शब्द वापरण्याचे प्रमाण जास्त आढळून आले आहे. या शब्दाचे घरवाले, घरवालो, घरना माणूस, घरवाला, घरचा माणूस इ. ध्वन्यात्मक वैविध्य आढळते. **धनी**

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत. परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.

हा शब्द सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पालघर, हिंगोली, औरंगाबाद आणि यवतमाळ या जिल्ह्यात तुरळक प्रमाणात आढळून येतो. महिला हा शब्द जास्त वापरतात. या शब्दाचे धनी, धळी इ. ध्वन्यात्मक वैविध्य आढळते.

**होडास** हा शब्द रायगड, ठाणे आणि पुण्याच्या मुळशी तालुक्यात कातकरी समाजात आढळून येतो. या शब्दाचे वहडास, वोडास, वडास, ओहोडास, ओढास इ. ध्वन्यात्मक वैविध्य आढळते.

**दादला** हा शब्द सांगली जिल्ह्यात मिळाला असून धाल्ला हे त्याचे ध्वनिवैविध्य आढळून आले आहे. **दाद्या** हा शब्द पालघर जिल्ह्यात आणि औरंगाबाद जिल्ह्यात मिळाला आहे.

**लाडा/लाडो** हा शब्द धुळे जिल्ह्यातील पावरा, नागपूर जिल्ह्यात मरार आणि अमरावती जिल्ह्यात लाडशी ही मातृभाषा असणाऱ्या बौद्ध समाजात तुरळक प्रमाणात वापरला गेला आहे.

**मरद** हा शब्द धुळे, नंदुरबार आणि नाशिक जिल्ह्यातील चांभार समाजात आढळून येतो. तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुस्लिम समाजात **मर्द, शोअर, मिया हे** शब्द वापरले गेले आहेत.

**माटी** हा शब्द नंदुरबार जिल्ह्यातील भिल्ल समाजात, धुळे जिल्ह्यातील पावरा स, पालघर जिल्ह्यात धोडिया समाजात तुरळक प्रमाणात दिसून येतो.

**मिश्टर** हा शब्द सांगली, पुणे, रत्नागिरी, अहमदनगर, परभणी, नाशिक, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, या जिल्ह्यात प्रामुख्याने स्त्रिया वापरताना दिसतात. या शब्दाचे मिस्टर, मिस्टेर इ. ध्वन्यात्मक वैविध्य आढळते. **हजबंड** या शब्दाचा वापर अमरावती आणि भंडारा जिल्ह्यात तुरळक प्रमाणात दिसून येतो. **साज़न** हा शब्द कोल्हापूर जिल्ह्यात, **साना** हा शब्द अमरावती जिल्ह्यातील कोरकू समाजात तर **साहेब** हा शब्द गडचिरोलीतील गोंड समाजात तुरळक प्रमाणात मिळाला आहे. तसेच **बवा** हा शब्द धुळे जिल्ह्यात, **बुवा** हा शब्द पालघर जिल्ह्यात तर **बांडगा** हा शब्द नाशिक जिल्ह्यात सापडला आहे. त्याचबरोबर **मुजो** हा शब्द गडचिरोली जिल्ह्यात गोंड समाजात तर **यज़मान** हा शब्द भंडारा जिल्ह्यात ब्राम्हण समाजात दिसून येतो. नंदुरबार जिल्ह्यातील वळवी समाजात **कोवाळ** हा शब्द तर गुजर समाजात **वराजो** हा शब्द दिसून येतो.

ह्या सामग्रीचे अधिकार क्रिएटिव्ह कॉमन्स संस्थेच्या श्रेयनिर्देशन-समवितरण ४.० ह्या परवान्याअंतर्गत मुक्त करण्यात येत आहेत.
परवान्याच्या मजकुरासाठी पुढील दुवा पाहता येईल. http://creativecommons.org/licenses/by-nc-sa/4.0/.